प्रबंध लिहताना ................

कार्यपुर्तीचा आनंद काही वेगळाच एखादे काम हाती घेतानाची अवस्था वेगळीच असते. कामाची अनभिज्ञता अनामिक हुरहुर लावते तशीच अस्वस्थता वाढविते आणि प्रचंड दडपण आणते.

शिवाजी विदयापिठाच्या एम.फिल. पदवी परीक्षेसाठी असलेला अविभाज्य भाग म्हणजे लघु-शोध निबंध शहरीकरणाच्या समस्या व नगरपालिकेचे राजकारण या विषयावर प्रबंध लिहण्याचे काम हाती घेतले. तेव्हाची अवस्था काहीशी अशीच होती. या लघु शोध निबंधाचा विषय निवडण्यापासून ते प्रबंधमाला पूर्ण रुप प्राप्त करण्यात माझे गुरु, मार्गदर्शक डॉ. अशोक चौसाळकर सर (राज्याशास्त्र विभाग, शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर) यांनी मोलाची मदत केली. त्यांनी वेळोवळी केलेल्या सूचना व बहूमूल्य मार्गदर्शनामुळे तसचे त्यांनी माझ्या अडचणी समजावून घेतल्यामुळे या प्रबंधाला पूर्णत्व प्राप्त झाले आहे.

फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड अशा माझ्या मॅडम डॉ. नानिवडेकर, कोल्हापूर यांनी दिलेला धीर, ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रवृत्त केल्यामुळे आज हा प्रबंध पूर्ण होतो आहे. तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीनारायण सर, डॉ.सौ. रासम मॅडम, डॉ.कावळेकर सर, श्री. तोरस्कर यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

प्रबंधासाठी आवश्यक असणारे साहित्य उपलब्ध करुन देण्यात अनेकांचा हातभार आहे. यात समाजवादी प्रबोधिनीचे संस्थापक आचार्य श्री शांताराम गरुड, नगरपालिकेचे प्रशासनाधिकारी श्री इरसाले, मुख्याधिकारी श्री शिवमूर्ती नाईक भारतीय जनता पक्षाचे नेते, माजी उपनगराध्यक्ष श्री शंकरराव पुजारी, कम्युनिष्ट पक्षाचे झुंजार नेते इचलकरंजीचे माजी नगराध्यक्ष कै. कॉ. के.एल.मलाबादे, कॉंग्रसचे नेते व इ.न.पा. चे सूत्रधार श्री सदाशिवराव मुरदंडे तसचे मला घडवणारे कन्या महाविदयालय इचलकरंजीचे प्रा. एस.ए.पाटील सर या सर्वांचे आभार मानावे तितके थोडेच

हा लघु शोध निबंध पूर्ण होण्याच्या कामी माझे काका श्री अनंतराव बोंगाळे, माझ्या भगिनी, मैत्रिणी तसेच वृत्तपत्रातील कात्रणे, माहिती व प्रबंधाचे लिखाण करण्याच्या कामात माझे पती प्रा. केतन खटावकर यांची खूप मदत झाली.

आई वडिलांच्या आशिर्वादाशिवाय हा खटाटोप पूर्णत्वास गेलाच नसता.

हा सगळा पट क्षणार्धात उलगडला आणि प्रबंध पुर्तीचा आनंद कृतार्थतेंचे समाधान देता झाला.